महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८ वा मजला, न्यु एक्सलसिअर
बिल्डींग, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी :०२२ - २२०१६१५९/५३
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र. रासाप्रपक/एमएचटी-सीईटी २०१९/Normalization Score/सूचना/७९७४ दिनांक : 18 JUL 2019

# सूचना

एमएचटी-सीईटी २०१९ ऑनलाईन प्रवेश परीक्षेसंबंधी सांख्यिकी तज्ञ समिती नॉर्मलायझेशन (Normalization) फॉर्म्युला निश्चित करणे, प्रक्रिया ठरविणे आणि निकाल याकरिता गठित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना नॉर्मलायझेशन ची पध्द्त व फॉर्म्युला परीक्षा अर्ज सादर करण्याआधीच ज्ञात करुन दिला होता. ज्या विद्यार्थ्यांना Normalization बाबत आक्षेप असतील त्यांनी प्रतिज्ञापत्र भरुन आपले आक्षेप नोंदवावे.

एमएचटी-सीईटी २०१९ चा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी /पालक यांचे ई-मेल, अर्जाद्वारे आक्षेप प्राप्त झाले व त्यानंतर ७६१२/२०१९ व १८५११/२०१९ याचिका उच्च न्यायालयात दाखल झाली.

विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्राद्वारे प्राप्त झालेले आक्षेप गठित करण्यात आलेल्या सांख्यिकी तज्ञ समितीसमोर ठेवण्यात येवून समितीने निर्देशित केल्याप्रमाणे संबंधितांच्या आक्षेपाला उत्तरे देण्यात येतील.

सदर याचिका निकालात काढताना मा. उच्च न्यायालयाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाला विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करावे अशी सूचना केली होती.

त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांना नॉर्मलायझेशन प्रक्रियेबाबत आक्षेप असतील त्यांनी आपले आक्षेप राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षासमोर प्रतिज्ञापत्रा / प्राधिकार पत्राद्वारे सादर करावेत. आलेले आक्षेप मूळ तज्ञ समिती व इंडीयन इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे (IIT, Mumbai) यांचे दोन अतिरिक्त तज्ञ यांच्या समोर सादर करण्यात येतील व त्यांचा निर्णय संबंधितांना कळविण्यात येईल व त्याबाबत मा. उच्च न्यायालयाला अवगत करण्यात येईल.

(श्री. आनंद ए. रायते), भाप्रसे
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned by CamScanner